सन २०२६-२७ करिता मुख्यलेखाशीर्ष २०५२- सचिवालय सर्वसाधारण सेवा (००) (१०) माहिती तंत्रज्ञान संचालनालय (२०५२ ०४८२) (कार्यक्रम) खालील १७-संगणक खर्च या तपशीलवार शीर्षाखालील मंजूर अनुदानातून निधी वितरण करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग**
**शासन निर्णय क्र.मागणी-२०२६/प्र.क्र.१२३/TECH-१ (E-१७९७१६१)**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दि. १८ सप्टेंबर, २०२६

संदर्भ : १. सामान्य प्रशासन विभाग (मातं) शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण-१७२४/प्र.क्र.२२८/मातं, दि. २३/०९/२०२४
२. सामान्य प्रशासन विभाग (मातं) शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण-१७२६/प्र.क्र.४५/मातं, दि. ०९/०३/२०२४
३. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग शासन निर्णय: PIC-२०२६/प्र.क्र.८२/Tech-१, दि. ०९ जुलै, २०२६.
४. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग शासन निर्णय क्रमांक: HPC-२०२६/C.R.१२४/TECH-१, दि. ०६ ऑगस्ट, २०२६

**प्रस्तावना:**

माहिती तंत्रज्ञान संचालनालयामार्फत राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये IT Cell अंतर्गत कार्यरत तांत्रिक मनुष्यबळ, मंत्रालयात FMS Team अंतर्गत कार्यरत तांत्रिक मनुष्यबळ तसेच मंत्रालयात e-Office Team अंतर्गत कार्यरत तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवांसाठीचे वेतन अदा करण्यासाठी येणाऱ्या खर्चास उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये वेळोवेळी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर बाबींवरील खर्च भागविण्याकरिता निधी वितरित करण्याबाबत वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने सन २०२६-२७ करीता मंजूर अर्थसंकल्पिय तरतुदीतून **रु. १५,०४,५६,३९५/- (रुपये पंधरा कोटी चार लक्ष छप्पन हजार तीनशे पंच्यान्नव फक्त)** (करासहित) इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

माहिती तंत्रज्ञान संचालनालयामार्फत राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये IT Cell अंतर्गत कार्यरत तांत्रिक मनुष्यबळ, मंत्रालयात FMS Team अंतर्गत कार्यरत तांत्रिक मनुष्यबळ तसेच मंत्रालयात e-Office Team अंतर्गत कार्यरत तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवांसाठीचे खालीलप्रमाणे वेतन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **बाब / टीम** | **तांत्रिक मनुष्यबळ** | **कालावधी** | **देयक / आवश्यक निधी (करासहित)** |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हास्तरीय IT Cell | ३०४ | मार्च, २०२६ | **रु. २,५०,३७,३३९/-** |
| २ | जिल्हास्तरीय IT Cell | ३०४ | एप्रिल, २०२६ ते जुलै, २०२६ | **रु. १०,०१,४९,३५६/-** |
| | | | IT Cell उप एकूण | **रु. १२,५१,८६,६९५/-** |
| ३ | मंत्रालयातील FMS Team | ४७ | एप्रिल, २०२६ ते ऑगस्ट, २०२६ | **रु. १,८३,७४,२१७/-** |
| ४ | मंत्रालयातील e-Office Team | १८ | मार्च, २०२६ | **रु. १७,५६,७९९/-** |
| ५ | मंत्रालयातील e-Office Team | १८ | एप्रिल, २०२६ ते जून, २०२६ | **रु. ५१,३८,६८४/-** |
| | | | e-Office Team उप एकूण | **रु. ६८,९५,४८३/-** |
| | | | **उपरोक्त नमूद देयकांची एकूण रक्कम** | **रु.१५,०४,५६,३९५/-** |

२. उपरोक्त नमूद वेतनावर होणारा खर्च भागविण्याकरिता सन २०२६-२७ करीता मंजूर अर्थसंकल्पिय तरतुदीतून **रु. १५,०४,५६,३९५/- (रुपये पंधरा कोटी चार लक्ष छप्पन हजार तीनशे पंच्यान्नव फक्त) (करासहित)** इतका निधी खालील अटींच्या अधीन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२.१) प्रस्तावातील प्रत्येक बाबीसाठी सक्षम प्राधिकाऱ्याची प्रशासकीय मान्यता, उच्चाधिकार समिती/प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता व कार्यादेश यांची वैधता तपासूनच संबंधित देयके अदा करण्यात यावीत, याबाबत इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तलयाकडून दक्षता घेण्यात यावी.

२.२) महाआयटीकडून प्राप्त देयकांची कार्यादेशातील अटी, मंजूर मनुष्यबळ, मंजूर कालावधी, प्रत्यक्ष सेवा व देय दर यांच्याशी पडताळणी करून, करासहित योग्य व पात्र रक्कमच अदा करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत मंजूर मर्यादेपेक्षा अधिक खर्च होणार नाही याची दक्षता इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाने घ्यावी.

२.३) प्रस्तावित वेतनाच्या रकमेची पडताळणी करुन सदर वेतन यापूर्वी संबधीतांना अदा करण्यात आले नाही. याबाबतची तपासणी करण्याची जबाबदारी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाची राहील.

२.४) सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वितरीत करण्यात येणार आहे, त्याकरिता खर्च करण्याची दक्षता इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाकडून घेण्यात येईल.

२.५) सदर रक्कमा अदा करतांना विहित कार्यपध्दतीने अनुपालन करण्याची तसेच सदर खर्चाच्या रक्कमेची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाची राहिल.

२.६) वित्त विभागाने निधी उपलब्ध करून देताना नमूद केलेल्या खालील अटींचे पालन करण्याची दक्षता देखील इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाकडून घेण्यात येईल.

i. केवळ उपस्थितीच्या आधारे देयक अदा करण्यात येऊ नये. संबंधित नोडल अधिकाऱ्यांनी तांत्रिक मनुष्यबळाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या तांत्रिक निष्पत्ती/कामाच्या गुणवत्तेबाबत तसेच नियुक्त मनुष्यबळाच्या कार्यक्षमतेबाबत प्रमाणित करणे आवश्यक राहील. तसेच, देयकाची अंतिम पात्र रक्कम निश्चित करताना संबंधित सेवांचा वापर करणाऱ्या वापरकर्त्यांकडून (Users) प्राप्त अभिप्रायाचाही विचार करण्यात यावा.

ii. MahaIT कडून सादर करण्यात आलेल्या देयकांची Service Level Agreement (SLA) मधील तरतुदींनुसार पडताळणी करण्यात यावी. सेवा पुरविताना आढळून आलेल्या कोणत्याही त्रुटी, निर्धारित कालमर्यादेत (Turnaround Time) तांत्रिक समस्या सोडविण्यात आलेले अपयश अथवा अनधिकृत अनुपस्थिती यांचा देयक निश्चित करताना योग्य प्रकारे विचार करण्यात यावा.

iii. सेवांची गुणवत्ता अपुरी असल्याचे आढळून आल्यास किंवा शासन निर्णयांमध्ये (GRs) निर्धारित केल्यानुसार IT प्रकल्पाशी संबंधित कामकाजाची अंमलबजावणी करण्यात आलेली नसल्यास, अंतिम देयक अदा करण्यापूर्वी देयकाच्या रकमेत कामाच्या प्रमाणात योग्य ती कपात अथवा दंडाची रक्कम समायोजित करण्यात यावी.

३. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाकडून उपरोक्त नमूद बाबीसाठी होणारा खर्च हा नेमून दिलेले **"लेखाशिर्ष मागणी क्रमांक ए-४, २०५२ सचिवालय सर्वसाधारण सेवा (००) (१०) माहिती तंत्रज्ञान संचालनालय, (२०५२ ०४८२) (कार्यक्रम) १७-संगणक खर्च"** याखाली खर्ची टाकण्यात यावा. व तो वित्तीय वर्ष सन २०२६-२७ साठी मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर निधी वितरीत करण्याकरीता अधिदान व लेखा कार्यालयातून आहरीत करण्यासाठी उपसचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग यांना नियंत्रक अधिकारी तसेच लेखाधिकारी, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाने सदर खर्च करताना वित्त विभागाच्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका (भाग-१) १९७७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व वित्त विभागाच्या **अनौ.स.क्र. ५१७/व्यय-४, दि. २५/०८/२०२६** अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९१८११२८०२८९११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DURGAPRASAD
POCHAYYA MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI, 2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.09.18 11:29:50 +05'30'

**(दुर्गाप्रसाद मैलावरम)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१) सचिव (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता ) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२) आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय यांचे स्वीय सहायक, मुंबई.
३) उपसचिव (अर्थसंकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
७) वित्त विभाग, कार्यासन अर्थसंकल्प, व्यय-४, मंत्रालय, मुंबई
८) रोखशाखा (३ प्रती), इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग आयुक्तालय, मंत्रालय, मुंबई
९) निवडनस्ती.